गुरुवार, १४ ऑक्टोबर २०२१

राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक ८७
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांची प्रकृती बिघडली



**नवी दिल्ली** : देशाचे माजी पंतप्रधान आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मनमोहन सिंग यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गेल्या दोन दिवसांपासून त्यांना ताप येत असून प्रकृतीत सुधारणा होत नसल्यामुळे अखेर त्यांना बुधवारी (दि. १३) संध्याकाळी ६ वाजण्याच्या सुमारास रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे वृत्त एएनआय वृत्तसंस्थेने दिले आहे. त्यांच्यावर रुग्णालयात तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. या वर्षी एप्रिल महिन्यात मनमोहन सिंग यांना कोरोनाची लागण झाल्यानंतर त्यांना एम्समध्येच दाखल करण्यात आले होते. त्या वेळी त्यांना कोरोनाची सौम्य लक्षणे जाणवत होती. ८९ वर्षीय सिंग हे कोरोनावर मात करून घरीदेखील परतले होते, मात्र आता पुन्हा त्यांना अशक्त वाटू लागल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

### अंतरंग

पंतप्रधान मोदींच्या हस्ते ‘गती शक्ती’चा शुभारंभ/२
एक्स्प्रेस वेवर द बर्निंग टेम्पो; एकाचा मृत्यू/५
रायगड प्रीमियर लीगच्या सराव सामन्यांना सुरुवात/६

# अतिवृष्टीबाधितांसाठी अखेर मदत जाहीर

## भाजपच्या सातत्यपूर्ण मागणीला यश

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपने सातत्याने लावून धरलेल्या मागणीमुळे राज्यातील पूरग्रस्त, तसेच अतिवृष्टीबाधितांसाठी अखेर ठाकरे सरकारने मदत जाहीर केली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बुधवारी (दि. १३) झालेल्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. त्यानुसार अतिवृष्टीबाधित आणि पूरग्रस्तांना १० हजार कोटींची मदत जाहीर करण्यात आली आहे.

राज्यात जून ते ऑक्टोबर २०२१ या काळात आलेल्या पुरामुळे, तसेच अतिवृष्टीमुळे ५५ लाख हेक्टरहून अधिक शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी नुकसानग्रस्त भागाला भेट देऊन शेतकरी, तसेच अन्य बाधित घटकांना राज्य सरकारने जास्तीत जास्त मदत तातडीने देण्याची मागणी केली होती. शेतकऱ्यांना जोपर्यंत मदत मिळत नाही तोपर्यंत आमचा संघर्ष सुरूच राहील, असेही त्यांनी म्हटले होते. अखेर नैसर्गिक संकटामुळे नुकसान झालेल्यांना सरकारी मदत जाहीर करण्यात आली आहे.

जिरायतीसाठी प्रति हेक्टर १० हजार रुपये, बागायतीसाठी प्रति हेक्टर १५ हजार रुपये, बहुवार्षिक पिकांसाठी प्रति हेक्टर २५ हजार रुपये मदत देण्यात येणार आहे. ही मदत दोन हेक्टर मर्यादेत करण्यात येईल.

**ड्रग्जविरोधात केंद्राची योजना**

राज्यात ड्रग्जचा सुळसुळाट झाला आहे. या पार्श्वभूमीवर मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृती योजना ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. ही योजना २०२३पर्यंत राबविण्यात येणार असून योजनेच्या १३ कोटी ७० लाख रुपये खर्चासही या वेळी मंजुरी देण्यात आली.



### फडणवीस यांनी लावून धरला होता मुद्दा

यंदा राज्यात अतिवृष्टीमुळे अनेक भागांत पूर येऊन नुकसान झाले. त्यात कित्येकांचे संसार उद्ध्वस्त झाले. काही ठिकाणी दरड कोसळून दुर्घटना घडल्या. यात जीवित तसेच वित्त हानी झाली. अतिवृष्टीचा फटका शेतकऱ्यांनाही बसला. खरीप हंगामातील हातातोंडाशी आलेली पिके मुसळधार पावसात अक्षरश: वाहून गेली. या सर्व घटकांना नुकसानभरपाई मिळावी म्हणून विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस व प्रवीण दरेकर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. त्याचप्रमाणे राज्य सरकारने तातडीने आर्थिक मदत करून दिलासा द्यावा, अशी मागणी लावून धरली होती.

## शिवसेना आमदारावर टीका करीत शेकापचा अलिबागेत ‘रास्ता रोको’

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-रोहा रस्त्याचे काम सुरू व्हावे या मागणीसाठी शेकाप पुरोगामी युवक संघटनेने बुधवारी (दि. १३) खानाव येथे रास्ता रोको आंदोलन केले. या वेळी शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांच्यावर टीका केली.



राज्यातील शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या प्रमुख पक्षांच्या महाविकास आघाडीला ज्या इतर काही पक्षांचा पाठिंबा आहे त्यात शेतकरी कामगार पक्षाचाही समावेश आहे. आघाडी सरकारला दीड वर्ष होऊन गेले तरी त्यांच्यातील धुसफूस सुरूच असल्याचे अधूनमधून दिसून येते. प्रसंगी या पक्षांमध्ये वादावादीही होत असते. आता शेकापने शिवसेना आमदाराला लक्ष्य करून आंदोलन केले. याच आमदार महेंद्र दळवी यांनी शेकाप उमेदवाराचा गत विधानसभा निवडणुकीत दारूण पराभव केला होता.

शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांनी अलिबाग-रोहा रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र अडीच वर्षे होऊनही काम अपूर्णच आहे, असे सांगत बुधवारी शेकापतर्फे रस्त्यासाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

शेकाप रायगड जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, अलिबागचे नगराध्यक्ष प्रशांत नाईक, नृपाल पाटील, जि. प.चे माजी सदस्य संजय पाटील, संदीप घरत, अनिल पाटील, नगरसेवक, सरपंच, सदस्य यांच्यासह शेकाप पदाधिकारी, कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते. **(पान २ वर..)**

## कर्जतमधील शिवसेना, शेकाप कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेकडे आकर्षित होऊन कर्जत तालुक्यामधील पाषाणे ग्रामपंचायत हद्दीतील शिवसेना आणि शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी (दि. १२) भाजपचा झेंडा हाती घेतला. भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.

खांदा कॉलनीत झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजपचे कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, पनवेल महापालिकेचे नगरसेवक प्रकाश बिनेदार, कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, कर्जत तालुका युवा मोर्चा अध्यक्ष प्रमोद पाटील, सहकार सेलचे तालुकाध्यक्ष प्रकाश पेमारे, भाजप तालुका उपाध्यक्ष सचिन म्हस्कर, सरचिटणीस राजेश भगत, युवा नेते किरण ठाकरे, राहुल बदे आदी उपस्थित होते.





या वेळी भाजप कर्जत तालुका उपाध्यक्ष सचिन म्हसकर, कळंब विभाग अध्यक्ष संदीप पालांडे व पोशीर पं. स. विभाग अध्यक्ष सुनील शेळके यांच्या प्रयत्नाने पाषाणे ग्रामपंचायत हद्दीतील संभाजी वेहेले, दशरथ वेहेले, निलेश ऐनकर, नरेश धुळे, जगदिश धुळे, किरण नाईक, रोशन पाटील, समीर निचिंधे, सतीश जोशी, गणेश विषे, सतिश दिघे, हेमंत निचिंधे, राम जोशी, सुनील दळवी, अविनाश दळवी, श्याम जोशी, निखिल ऐनकर, केतन ऐनकर, सागर दळवी, नंदू दळवी, राजेश जोशी या शिवसेना व शेकाप कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांनी पक्षात स्वागत केले.

### निवडक

#### राज्यातील महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून होणार सुरू

**मुंबई** : राज्यातील शाळा सुरू झाल्यानंतर महाविद्यालये कधी सुरू होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. अखेर २० ऑक्टोबरपासून राज्यातील कॉलेज सुरू होणार आहेत, मात्र विद्यार्थ्यांना कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस घेणे आवश्यक असणार आहे, अशी माहिती राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

#### टी-२० वर्ल्डकपसाठी शार्दुल ठाकूरला संधी

**नवी दिल्ली** : आगामी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी काही दिवसांचा अवधी उरला असताना टीम इंडियात एक बदल झाला आहे. मुंबईकर अष्टपैलू क्रिकेटपटू शार्दुल ठाकूरला १५ सदस्यीय भारतीय संघात जागा मिळाली आहे. शार्दुलने अक्षर पटेलची जागा घेतली आहे. वर्ल्डकपला १७ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार असून भारतीय संघाची पहिली लढत २४ ऑक्टोबरला पाकिस्तानविरुद्ध होईल.

## भाजप भटके विमुक्त महिला आघाडी जिल्हाध्यक्षपदी विद्या तामखडे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप भटके विमुक्त महिला आघाडीच्या उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षपदी कामोठे येथील विद्या तामखडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. १३) तामखडे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, भटके विमुक्त आघाडी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष आबा घुटूकडे, पनवेल मंडल अध्यक्ष गोपीनाथ मुंडे, व्यापारी आघाडी कामोठे अध्यक्ष नानासाहेब मगदूम, कामोठे संयोजक कैलास सरगर, सहसंयोजक उत्तम जाधव आदी उपस्थित होते.

विद्या तामखडे यांना भटके विमुक्त आघाडीच्या महिला अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली असून भारतीय जनता पक्षाचा सामाजिक समरसतेचा संदेश उत्तर रायगड जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकापर्यंत विविध उपक्रम व कार्यक्रमांतर्गत पोहचवण्याबरोबरच **(पान २ वर..)**

## न्हावे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भाजपचे हरिश्चंद्र म्हात्रे विराजमान

**उरण : प्रतिनिधी**

न्हावे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भारतीय जनता पक्षाचे हरिश्चंद्र म्हात्रे यांची बिनविरोध निवड झाली आहे. याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित सरपंच म्हात्रे यांचे अभिनंदन केले. **(पान २ वर..)**





## स्वस्तिका घोषची ‘सुवर्ण’ कामगिरी

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी असलेली टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोषने भारताकडून खेळताना ट्युनिशिया ओपनचे विजेतेपद पटकाविले आहे. स्वस्तिकाने १९ वर्षांखालील मुलींच्या एकेरी गटात ही ‘सुवर्ण’ कामगिरी साकारली.

याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाचे अभिनंदन व कौतुक केले. या वेळी व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, स्वस्तिकाचे वडील व प्रशिक्षक संदीप घोष आदी उपस्थित होते.

यापूर्वीही स्वस्तिका घोषने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करून पदके जिंकली आहेत. परदेशात प्रथमच तिने सुवर्णपदकाला गवसणी घातल्याने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## आर्यनचा तुरूंगातील मुक्काम पुन्हा वाढला

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई क्रूज ड्रग्स प्रकरणातील आरोपी आर्यन खानच्या जामीन अर्जावर बुधवारी (दि. १३) जवळपास तीन तास सुनावणी झाली, मात्र कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे आर्यनचा तुरूंगातील मुक्काम वाढला आहे.

ड्रग्स प्रकरणात अभिनेता शाहरूख खानचा मुलगा आर्यन न्यायालयीन कोठडीत आहे. त्याचा जामीन अर्ज दंडाधिकारी न्यायालयाने फेटाळल्यानंतर हे प्रकरण विशेष न्यायालयात आले आहे. दरम्यान, शाहरूखने वकील सतीश मानशिंदे यांना बाजूला करीत नवीन वकील अमित देसाई यांची नियुक्ती केली आहे. दुसरीकडे अमली पदार्थविरोधी विभागानेही (एनसीबी) जोरदार कंबर कसून पुरावे सादर केले आहेत. आता यावर पुन्हा गुरुवारी सुनावणी होणार आहे.



# ग्रामीण भागात विकासपर्व

## ■ पनवेलमधील वांगणी तर्फे वाजेत विविध कामांचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा नियोजन निधीतून वांगणी तर्फे वाजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत मंजूर झालेल्या कामांचे भूमिपूजन बुधवारी (दि. १३) झाले. भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

या कामांमध्ये रा.जि.प. शाळा मोहो दुरुस्ती करणे (चार लाख रुपये), मोहो येथे स्मशानभूमी बांधणे (१२ लाख रुपये), मोहो येथे अंतर्गत पेवर बॉल्क बसविणे (आठ लाख रुपये), मोहोचापाडा येथे अंगणवाडी बांधणे (आठ लाख ५० हजार रुपये), पाली खुर्द येथे अंगणवाडी बांधणे (आठ लाख ५० हजार रुपये), पाली खुर्द येथे अंतर्गत काँक्रीटीकरण करणे (आठ लाख रुपये), लोणीवली येथे अंगणवाडी बांधणे (आठ लाख ५० हजार रुपये), आंबिवली येथे अंगणवाडी बांधणे (आठ लाख ५० हजार रुपये), रा.जि.प. शाळा आंबिवली दुरुस्ती करणे (चार लाख रुपये), रा.जि.प. शाळा लोणीवली दुरुस्ती करणे (चार लाख रुपये), वांगणी येथील अंगणवाडी दुरुस्ती करणे (एक लाख रुपये) या कामांचा समावेश आहे.





या वेळी जि. प. सदस्य अमित जाधव, वांगणी तर्फे वाजे ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच सुरेखा अशोक पवार, उपसरपंच अक्षदा प्रवीण म्हात्रे, माजी सरपंच गुरुनाथ भोईर, माजी उपसरपंच संतोष गोविंद शेळके, प्रमोद म्हात्रे, प्रवीण पालव, सदस्य संतोष पाटील, भाजप विचुंबे विभागीय अध्यक्ष सतीश मालुसरे, किशोर सुरते, प्रमोद भिंगारकर, अतिश मालुसरे, दीपक भालेकर, बळीशेठ मालुसरे, बबन मालुसरे, नथू मालुसरे, गोपीनाथ भालेकर, भाऊ पाटील, सुभाष पाटील, दत्तात्रेय शेळके, राम शेळके, बाळाराम गाताडे, आप्पा पाटील, गणेश पाटील, मयूर घरत, राम म्हस्कर आदी उपस्थित होते.

# पंतप्रधान मोदींच्या हस्ते 'गती शक्ती'चा शुभारंभ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी (दि. १३) नवी दिल्ली येथे मल्टी मोडल कनेक्टिव्हिटीसाठी पीएम गती शक्ती राष्ट्रीय महायोजनेचा प्रारंभ केला. नवी दिल्लीतील प्रगती मैदानावरील नवीन प्रदर्शन संकुलाचे उद्घाटनही त्यांनी केले.




केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पीयूष गोयल, हरदीपसिंग पुरी, सर्वानंद सोनोवाल, ज्योतिरादित्य सिंधिया आणि अश्विनी वैष्णव, आर. के. सिंह, मुख्यमंत्री नायब राज्यपाल, राज्यमंत्री, प्रख्यात उद्योगपती या वेळी उपस्थित होते.

उपस्थितांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आत्मनिर्भर भारत या संकल्पामुळे पुढील २५ वर्षांसाठी भारताचा पाया आज रचला जात आहे. पीएम गती शक्ती राष्ट्रीय महायोजना (मास्टर प्लॅन) भारताचा आत्मविश्वास आत्मनिर्भरतेच्या संकल्प सिद्धीकडे घेऊन जाईल. हा मास्टर प्लान २१ व्या शतकातील भारताला गती शक्ती देईल, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

भारतातील जनता, भारतीय उद्योग, भारतीय व्यवसाय, भारतीय उत्पादक, भारतीय शेतकरी गतिशक्तीच्या या महाअभियानाच्या केंद्रस्थानी आहेत यावर पंतप्रधानांनी भर दिला. आम्ही केवळ निर्धारित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याची कार्यसंस्कृती विकसित केली नाही तर आता प्रकल्प वेळेपूर्वी पूर्ण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. मास्टर प्लॅनच्या आधारे काम केल्यामुळे संसाधनांचा योग्य वापर होईल.

भारतातील पायाभूत विकासाचा वेग वाढवण्यासाठी उचललेल्या पावलांबद्दल या वेळी पंतप्रधानांनी सविस्तर विवेचन केले. देशातील शेतकऱ्यांचे, मच्छीमारांचे उत्पन्न वाढवायचे असेल, तर प्रक्रियांशी संबंधित पायाभूत सुविधा वेगाने वाढवल्या पाहिजेत, असे पंतप्रधानांनी सांगितले.

पीएम गती शक्ती ही मोठी महत्त्वाची सहकार्य करणारी बाब असणार आहे. जेएएम म्हणजेच जनधन, आधार आणि मोबाइल ही त्रिसूत्री जनतेपर्यंत सरकारी सुविधा पोहचवणारी ठरली त्याचप्रमाणे पायाभूत सुविधा क्षेत्रात 'पीएम गती शक्ती' महत्त्वपूर्ण काम करेल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

उद्योग क्षेत्रातील आदित्य बिर्ला समूहाचे अध्यक्ष कुमार मंगलम बिर्ला, ट्रॅक्टर्स आणि फार्म इक्विपमेंट्सच्या मुख्य व्यवस्थापकीय संचालक मलिका श्रीनिवासन, टाटा स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक आणि भारतीय उद्योग महासंघाचे अध्यक्ष टीव्ही नरेंद्रन आणि रिविगोचे सह-संस्थापक दीपक गर्ग यांनीही या वेळी आपले विचार व्यक्त केले.



**पनवेल : भाजप महिला उलवे नोड अध्यक्ष निकिता खारकर यांनी नवरात्र उत्सवानिमित्ताने येथील नांदाई मंदिरात देवीचे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे गव्हाण विभागीय सरचिटणीस निलेश खारकर, नंदकुमार ठाकूर, स्वप्नील म्हात्रे, गीता ठाकूर, प्रसाद घरत आदी उपस्थित होते.**



**पनवेल : रेल्वे स्टेशनजवळील मालधक्का येथे ज्योती गुप्ता यांच्या घरी विराजमान देवीचे महापौर डॉ. कविता चौतमोल, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर यांनी दर्शन घेतले. या वेळी अशोक आंबेकर, नंदा तरपे, शैला आंबेकर आदी उपस्थित होते.**

## पनवेलमध्ये आज गाण्यांचा कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर व रोटरी क्लब ऑफ उलवे नोड यांच्या संयुक्त विद्यमाने कलासागर परिवार आयोजित स्व. किशोर कुमार यांच्या स्मृतिदिनानिमित्त गाता रहे मेरा दिल या गाण्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी (दि. १४) करण्यात आले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांची या कार्यक्रमाला उपस्थिती लाभणार आहे.

रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगरचे अध्यक्ष रवी नाईक व रोटरी क्लब ऑफ उलवे नोडचे अध्यक्ष शिरीष कडू यांनी स्थानिक कलाकारांना वाव देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

पनवेलच्या मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृहात होणारा हा कार्यक्रम सायंकाळी ४ वाजता होणार आहे. या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण फेसबुक, यू-ट्यूब आणि साई श्रद्धा टीव्ही चॅनेलवर होणार आहे.

# पनवेलमधील उग्र वासावर उपाययोजना करण्याची मागणी

### महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाला भाजपचे निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलसह नवीन पनवेल परिसरात सकाळी व संध्याकाळी उग्र स्वरूपाची दुर्गंधी येत आहे. या समस्येवर त्यावर त्वरित ठोस पावले उचलण्याकरिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळचे प्रादेशिक अधिकारी किल्लेदार यांना भाजपच्या वतीने निवेदन देण्यात आले.



गेले काही दिवस पनवेल, नवीन पनवेल परिसरात सकाळी व संध्याकाळी अतिशय उग्र वास येत आहे. घरगुती गॅस लिकेज झाल्यासारखा वास येत असल्याने महिला व ज्येष्ठ नागरिक घाबरत आहेत. तळोजा एमआयडीसी किंवा पनवेल एमएसआय येथील कंपनीतून ही दुर्गंधी येत असल्याचा अंदाज आहे. रहिवाशांना श्वसनाचा, दम्याचा त्रास होत असल्याच्या तक्रारीही येत आहेत. अशा कंपनीवर कारवाई करावी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी पनवेलचे माजी नगराध्यक्ष तथा भाजपचे शहर उपाध्यक्ष संदीप पाटील आणि प्रभाग समिती सभापती सुशिला जगदिश घरत यांनी निवेदनात केली आहे. ही प्रत पनवेल महापालिका आयुक्तांना रवाना करण्यात आली आहे.

## दुखवटा

### सिकंदर केळकर

**अलिबाग :** रायगडचे माजी राष्ट्रीय कबड्डी खेळाडू सिकंदर केळकर (वय ३३) यांचे मंगळवारी (दि. १२) निधन झाले. त्याच्या पश्चात मुलगा, पत्नी असा परिवार आहे. शिवाई क्रीडा मंडळ बांधन या स्थानिक संघातून सिकंदर केळकर हे खेळत असे. महिंद्रा अ‍ॅण्ड महिंद्रा हा त्यांचा व्यावसायिक संघ असून उत्कृष्ट चढाईपटू आणि कोपरा रक्षक म्हणून त्यांनी अनेक स्पर्धा गाजवल्या. सिकंदर केळकरच्या निधनामुळे कबड्डीक्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.



### स्मिता थत्ते

**पेण :** तालुक्यातील डोलवी येथील जेएसडब्ल्यू कंपनीचे जनसंपर्क अधिकारी कुमार थत्ते यांच्या मातोश्री स्मिता विजय थत्ते (वय ७१) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा आणि सून असा परिवार आहे. कै. स्मिता थत्ते यांचा अंत्यविधी अलिबाग येथील स्मशानभूमीत करण्यात आला.




## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी




**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**गुरुवार, दि. १४ ऑक्टोबर २०२१ रोजी होणारे**

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस**
**(वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. रोटरी क्लब, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

### कोव्हॅक्सिन

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
- ३. लिटिल वर्ल्ड मॉल, खारघर

### पनवेल ग्रामीण लसीकरण

- धानसर रा.जि.प. शाळा
- तोंडरे खालचा पाडा, रा.जि.प. शाळा
- रोडपाली बौद्धवाडी
- ढोंगऱ्याचा पाडा रा.जि.प. शाळा

**निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता २०० व दुसऱ्या डोसकरिता १०० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.**


## पान १ वरून

### शिवसेना आमदारावर टीका करीत शेकापचा अलिबागेत 'रास्ता रोको'

या वेळी बोलताना शेकापचे सहचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी शिवसेना आमदार महेंद्र दळवींवर टीका केली. शिवसेना आमदार हे निवडून आल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून स्वखर्चाने रस्त्याचे काम सुरू करणार होते, मात्र अडीच वर्षे झाले तरी हा रस्ता ठेकेदारांकडे टक्केवारी मागणी केल्याने रखडला, असा आरोप त्यांनी केला. आता शेकापच्या या आंदोलनावर आणि त्यांनी केलेल्या आरोपांवर आमदार दळवी काय उत्तर देतात याकडे अलिबागकरांचे लक्ष लागले आहे.

### भाजप भटके विमुक्त महिला आघाडी जिल्हाध्यक्षपदी विद्या तामखडे

जिल्ह्यातील पक्ष संघटना अधिकाधिक मजबूत करणे आणि आगामी काळात विविध निवडणुकांमध्ये पक्षाला मोठे यश मिळवून देण्यासाठी जिल्हा भटके विमुक्त आघाडी काम करेल, अशी अपेक्षा या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त करीत पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

पंतप्रधान नरेंद मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, प्रदेश अध्यक्ष चंद्रकांत पाटील, माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, तसेच उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विद्या तामखडे भाजपची ध्येयधोरणे व कार्यक्रमांची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करतील, अशी खात्री बबन बारगजे यांनी व्यक्त केली.

### न्हावे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भाजपचे हरिश्चंद्र म्हात्रे विराजमान

न्हावे ग्रामपंचायतीमध्ये भाजप, शेकाप, काँग्रेस अशी स्थानिक पातळीवरील ग्रामविकास आघाडी आहे. पाच वर्षांच्या सत्ताकाळात ग्रामविकास आघाडीचे सरपंचपद तीन वर्षांसाठी शेकापकडे, तर दोन वर्षे भाजपकडे बहाल करण्याचा अलिखित करार करण्यात आला होता. त्यानुसार दोन वर्षांनंतर जितेंद्र म्हात्रे यांनी सरपंचपदाचा राजीनामा दिला. रिक्त झालेल्या सरपंचपदासाठी बुधवारी (दि. १३) निवडणूक जाहीर झाली होती.

पीठासन अधिकारी गणेश तेलंगे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या निवडणुकीत सरपंचपदासाठी हरिश्चंद्र म्हात्रे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाला. त्यामुळे त्यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. यानंतर फटाक्यांची आतषबाजी करीत सर्वपक्षीयांनी त्यांचे अभिनंदन केले.

नवनिर्वाचित सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांनी गावाच्या विकासासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे अभिवचन दिले. मावळते सरपंच जितेंद्र म्हात्रे यांनी हरिश्चंद्र म्हात्रे यांना शुभेच्छा देताना आपले सहकार्य यापुढेही राहणार असल्याची ग्वाही दिली. माजी सरपंच व ग्रामविकास आघाडीचे अध्यक्ष चंद्रकांत भोईर यांनी, आपण न्हावे ग्रामपंचायतीचे दोन वेळा सरपंचपद भूषविले असल्याने आपल्या अनुभवाचा फायदा ग्रामपंचायतीला होईल, असा विश्वास व्यक्त केला. निर्मला काशिनाथ ठाकूर यांनी हरिश्चंद्र म्हात्रे यांचे अभिनंदन करून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्य दिले जाईल, असे सांगितले.

या वेळी भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, माजी उपसरपंच सागर ठाकूर, जयवंत देशमुख, गणेश म्हात्रे, वामन म्हात्रे, विश्वनाथ कोळी, अनंता ठाकूर, उपसरपंच मंजुषा ठाकूर, सदस्य किसन पाटील, सागर ठाकूर, देवेंद्र भोईर, निर्मला ठाकूर, विजया ठाकूर, कल्पना घरत, अमृता पाटील, साधना तांडेल, नितीन भोईर, चंद्रकांत पाटील, अंबरनाथ पाटील, ग्रामविकास अधिकारी एन. आर. शेडगे उपस्थित होते. सर्वांनी नवनिर्वाचित सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सरपंच म्हात्रे यांच्या सौभाग्यवती धनवंती ऊर्फ सिम्पल यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्टपणे दिसत होता. सरपंचपदी पती विराजमान झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **Rfx No :- 7000021163**<br>**Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-50/2021-2022.**<br>RFx-E-tender for work of urgent replacement of rusted tower Loc no. LILO -1of 100kV Taloja - Bhokarpada - Pal D/C line in Taloja MIDC area & Loc no. 11 of 100kV Apta - Patalganga –Reliance D/C line under EHV Lines S/Dn Panvel under EHV(O&M)Division Panvel.<br>**Tender amount Limited to Rs.23,54,563/- EMD amount Rs. 23,546/-** |
| 2 | Online Downloading of the RFx | **14.10.2021, 17:00 Hrs. to 21.10.2021, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 21.10.2021 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **22.10.2021 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M. C. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV (O&M) DN PANVEL**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# उरणमधील अपघात रोखण्यासाठी भाजपचा पुढाकार

## ■ विविध उपाययोजनांसंदर्भात चर्चा आणि पत्रव्यवहार

उरण : प्रतिनिधी, वार्ताहर

उरणमधील सातत्याने होणाऱ्या अपघातांवर आळा घालण्यासाठी अथवा रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी भारतीय जनता पक्ष पूर्व विभागाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पदाधिकाऱ्यांनी आमदार महेश बालदी, तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, ग्रामपंचायत खोपटे-बांधपाडा आदी ठिकाणी पत्रव्यवहार करून निवेदन देण्यात आले आहे.

उरण तालुक्यात जेएनपीटी हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बंदर असल्याने उरण तालुक्यातील पूर्व विभागात विविध कंपनी, सीएफएस गोडावून, कन्टेनर यार्ड यांचे जाळे खूप मोठ्या प्रमाणात आहे. उरण तालुक्यातील पूर्व विभागात असलेल्या कंपनीच्या चुकीच्या नियोजनामुळे अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मुख्य रस्त्यावरून वाहने वळवताना गाडीवर क्लिनर नसणे, मुख्य रस्त्यावर, तसेच अपघात होणाऱ्या महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक नसणे, मुख्य रस्त्याच्या वळणाच्या ठिकाणी लाईटची सुविधा नसणे ही अपघात होण्याची मुख्य कारणे आहेत. या कारणांचा विचार करून भारतीय जनता पक्ष पूर्व विभागाच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.





### संबंधित प्रशासनाला सूचना देणार -आमदार महेश बालदी

***उरणमधील अपघाताच्या समस्येसंदर्भात भाजप पूर्व विभागाने केलेल्या मागणीचा विचार करून संबंधित कंपनी व्यवस्थापनाकडून तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी कंपनी प्रशासनाला सूचना देण्यात येतील, तसेच अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन आमदार महेश बालदी यांनी दिले.***

प्रत्येक कंपनीच्या मुख्य रस्त्याच्या वळणावर हायमास्ट बसविणे, मुख्य रस्त्याच्या वळणावर कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक नेमणे, कंपनीत येणाऱ्या जाणाऱ्या वाहनावर ड्रायव्हरसोबत क्लिनर ठेवणे बंधनकारक करावे, अशा मागण्या संबंधित विभागाकडे करण्यात आल्या आहेत.

अपघात रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी सांगितले. उरणमध्ये अनेक अपघात होत आहेत. त्यावर त्वरित उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाल्याने हे निवेदन कंपनी प्रशासन, शासकीय विभाग, तहसीलदार, आमदार यांना देण्यात आल्याचे भाजप चिरनेर पंचायत गण अध्यक्ष प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

या वेळी भाजप चिरनेर पंचायत गण अध्यक्ष प्रशांत ठाकूर, कोप्रोली विभाग अध्यक्ष शशी पाटील, बांधपाडा सरपंच विशाखा ठाकूर, विभाग अध्यक्षा सुगंधा कोळी, खोपटा युवा अध्यक्ष हेमंत ठाकूर, सदस्य अच्युत ठाकूर, सदस्य संदेश म्हात्रे, सदस्य मीनाक्षी म्हात्रे, सदस्य देवानंद पाटील, प्रितम ठाकूर, परेश पाटील, ज्ञानदीप ठाकूर, जयेश ठाकूर, चंद्रहास ठाकूर, अमित घरत आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# सुकापूरमध्ये कोरोना लसीकरण शिबिर

पनवेल : रामप्रहर वृत्त

कोरोना प्रादूर्भाव तसेच त्यामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी कोरोनाची प्रतिबंधक लस घेणे गरजेचे आहे. त्या पार्श्वभूमीवर सुकापूर येथील अन्नपूर्णा मंदिर ओम शिवा सोसायटीमध्ये कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते.




या वेळी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पालीदेवद ग्रामपंचायतीच्या सरपंच योगिता राजेश पाटील, माजी उपसरपंच आलूराम केणी, बुवाशेठ भगत, मेनका खुटले, सुकापूर गाव अध्यक्ष राजेश पाटील, सरचिटणीस उदय म्हसकर, प. ता. डॉ. सेलचे अध्यक्ष डॉ. कृष्णा देसाई, युवा मोर्चा सुकापूर अध्यक्ष महेश केणी, ग्रामपंचायत सदस्य दिवेश भगत, प्राची अमित जाधव, पूनम प्रमोद भगत, हिरा केणी, प्रमोद भगत, दीपक भगत, नरेश भगत, श्री. पाटील काका, श्री. वाघमारे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# सुभाष पुजारींवर अभिनंदनाचा वर्षाव

पनवेल : वार्ताहर

जागतिक शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांना ब्रांझ मेडल पी १२ व्या वर्ल्ड बॉडीबिल्डींग अ‍ॅण्ड फिजिक्स चॅम्पिअनशीप तश्कंद उझबेकीस्तान २०२१ या बॉडीबिल्डींग स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करून ८० किलो गटामध्ये ब्रॉझ मेडल मिळविलेले आहे.

त्याचबरोबर यापुर्वीही त्यांनी अनेक किताब मिळवले आहेत.सुभाष पुजारी हे महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे नवी मुंबई या ठिकाणी नेमणुकीस आहेत. पोलीस दलात सेवा बजावित असताना त्यांनी शरीरसौष्ठव हा छंद जोपासला आहे. त्यांच्या या यशामुळे महाराष्ट्र पोलीस दलामध्ये मानाचा तुरा खोवला गेला आहे.



पुजारी यांच्या या यशाबद्दल भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष तथा पनवेल मनपाचे नगरसेवक विक्रांत पाटील यांच्यासह राजकीय, सामाजिक व क्रिडा क्षेत्रातील व्यक्तींनी अभिनंदन केले आहे.

# पनवेलमध्ये सुरळीत वाहतुकीसाठी होणार ओडी सर्व्हे

पनवेल : प्रतिनिधी

पनवेल शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये सुधारणा व्हावी या दृष्टीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध ठिकाणांच्या वाहतूक व्यवस्थेचा अभ्यास करून, विकास आराखडा, वाहतूकीशी संबधित प्राथमिक दस्तऐवज वापरून या सर्वेक्षणाला सुरूवात केली गेली आहे. या अंतर्गत ओडी अर्थात ओरीजीन डेस्टीनेशन सर्व्हेला सुरूवात होणार आहे. यासाठी वाहतुक पोलिसांची मदत पालिका घेणार आहे.



या उद्देशाने बुधवारी (दि. १३) आयुक्त गणेश देशमुख यांनी वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पुरूषोत्तम कराड आणि वाहतूक पोलीस निरीक्षक पनवेलचे संजय नाळे यांच्यांशी वाहतूकीशी निगडीत विविध विषयांवर चर्चा केली. शहरात व्यापक वाहतूक योजना व पार्किंग धोरण तयार करण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण सुरू आहे. या अंतर्गतच ओडी सर्व्हे होणार असून १६ तास हा सर्व्हे शहरात येणाऱ्या मुख्य रस्त्यांवर होणार आहे. या दरम्यान वाहतूक कोंडी न होता सुरळीत वाहतूक व्हावी यासाठी वाहतूक उपायुक्तांशी चर्चा करण्यात आली. शहराला स्वत:ची वाहतूक पोलीस चौकी उभारण्यासाठी सकारात्मक चर्चा झाली. कळंबोली सर्कलवर होणारी वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी पालिकेच्या मध्यस्थीने वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करण्याचे बैठकीत ठरले.

या वेळी अतिरीक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त सचिन पवार, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर उपस्थित होते.

# नमन यामाहाच्या माईलेज चेक कॉम्पिटिशन कॅम्पला उदंड प्रतिसाद

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल नमन यामाहाने पनवेल येथे माईलेज चेक कॉम्पिटिशन कॅम्प आयोजित केला होता. त्यामध्ये यामाहा स्कूटरच्या अनेक मालकांनी भाग घेऊन यामाहा स्कूटर माईलेजमध्ये सर्वोत्तम आहेत हे सिद्ध केले.

जेव्हा कस्टमरच आपल्या स्कूटरचे माईलेज टेस्ट करतात तेव्हा यामाहा सांगत असलेल्या माईलेजला पुष्टी येते. त्यामुळे या गाड्यांवरती आपला विश्वास वाढतो, असे नमन यामाहाचे मालक गुरमीत सिंग कोहली यांनी सांगितले.

या कॅम्पमध्ये फॅसिनोचे प्रथम क्रमांकाच्या विजेत्याचे माईलेज ८४.११ किमी/लीटर, दुसऱ्या क्रमांकाचे ८२.०१ किमी/लीटर व तृतीय क्रमांकाचे ७७.१० किमी/लीटर मिळाले. या कॉम्पिटिशनसाठी यामाहाचे अनेक अधिकारी उपस्थित राहून कस्टमरकडून फीडबॅक घेत होते. उत्कृष्ट टेक्नॉलॉजी असल्यामुळे यामाहाच्या गाड्या सर्वांत जास्त माईलेज देतात, असे कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.



# सीकेटी विद्यालयात सरस्वतीपूजन

नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त

नवरात्रीनिमित्त दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय, इंग्रजी माध्यमात मंगळवारी (दि. १२) सप्तमीला सरस्वती पूजन करण्यात आले. पर्यवेक्षिका निरजा मॅडम यांनी सरस्वतीची पूजा केली. तर सर्व शिक्षकांनी दीपप्रज्वलन करून देवीला वंदन केले.

कार्यक्रमाची सुरुवात जिनल वालावलकर हिने दुर्गा सुक्त गाऊन केले. स्वराज चव्हाण या विद्यार्थ्याने नवरात्रीविषयी माहिती सांगितली. श्रावणी थळे हिने सुंदर नृत्य केले. पर्यवेक्षिका निरजा मॅडम यांनी नवरात्रोत्सव साजरा करण्यामागचा उद्देश विद्यार्थ्यांना सांगून नवरात्रीचे महत्त्व विषद केले. शिक्षकांनी महिषासूर मर्दिनी स्तोत्र आणि महालक्ष्मी अष्टक म्हटले.

सर्व विद्यार्थ्यांनी सरस्वती देवीचे आशीर्वाद घेतले. कोरोना नियमांचे काटेकोर पालन करत अतिशय मंगलमय वातावरणात हा कार्यक्रम सादर केल्याबद्दल मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

जिनल वालावलकर हिने उत्कृष्ट सूत्रसंचालन करून कार्यक्रमाची रंगत वाढविली. आभार मानल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.





# निर्मला फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव

रसायनी : वार्ताहर

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे आणि समाजासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्याच्या उद्देशाने गुळसुंदे येथे निर्मला फाउंडेशनची स्थापना करण्यात आली आहे. या फाउंडेशनच्या वतीने तुंगारतन विभाग विद्यामंदिर या विद्यालयातील एसएससी परीक्षेतील गुणानुक्रमे प्रथम पाच आलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला ज्यांच्या नावाने फाउंडेशन सुरू केले आहे त्या निर्मला पाटील, स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष आर. डी. पाटील, सदस्य सखाराम पाटील, मिलिंद वैद्य, मनोज पवार, मुख्याध्यापक जाधव आदी उपस्थित होते. या वेळी विद्यार्थी वेदांत दत्तात्रेय वाघे, अमृता अरुण राठोड, समृद्धी संपती पडवळ, नेहा जयवंत कालेकर, स्वरूपा भास्कर पाटील या दहावीच्या परीक्षेत गुणानुक्रमाने प्रथम पाच आलेल्या, तसेच आसावरी नरेश चौधरी या बारावी कॉमर्समध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थिनीचे उपस्थितांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन विशेष कौतुक करण्यात आले.

निर्मला फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल पाटील यांनी आपल्या मनोगतातून या फाउंडेशनतर्फे गुळसुंदे विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातील, असे सांगितले. आर. डी. पाटील व अन्य मान्यवरांनी फाउंडेशनच्या टीमचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या गुणगौरव कार्यक्रमास निर्मला फाउंडेशनचे पदाधिकारी विकास पाटील, प्रशांत पाटील, रूपाली पाटील, अभिजित पाटील, रूबेन पाटील उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक जाधव यांनी उपक्रमाद्दल फाउंडेशनचे आभार मानले.



खारघर : सेक्टर-११मध्ये राधाकृष्ण संकुल नवरात्री सांस्कृतिक समितीच्या देवीचे भाजप शहर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल व कुणाल सांगानी यांनी दर्शन घेतले. दरम्यान, हळदीकुंकू कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. या वेळी राधाकृष्ण कॉम्प्लेक्स सोसायटीचे सचिव मनोज कहार, सदस्य राकेश पाठक, प्रकाश फाटक, दुर्गा मंडळाचे सदस्य रिया पाठक, भाग्यश्री कोळी, रमा कुलकर्णी, वैशाली देशमुख, नीलम पुरोहित आदी सभासद व रहिवासी उपस्थित होते.



कळंबोली : दुर्गाशक्ती महिला प्रतिष्ठान यांच्या वतीने हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आले होते. या वेळी अध्यक्ष मनीषा निकम, सचिव श्वेता नगराळे, खजिनदार दुर्गा सहानी आदी महिला उपस्थित होत्या.



पनवेल : जि. प. सदस्य अमित जाधव यांच्या एकता मित्र मंडळाच्या नवरात्री उत्सवाला सुकापूरचे माजी सरपंच बुवाशेठ भगत, तसेच उद्योजक दीपक भगत, युवा मोर्चा सुकापूर अध्यक्ष महेश केणी, ग्रामपंचायत सदस्य दिवेश भगत, प्राची अमित जाधव यांनी भेट दिली.



तळोजा : वामनबाबा आदिवासी वाडीतील दुर्गामातेचे भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, माजी सरपंच संतोष पाटील, लीला कातकरी, सोपान कातकरी आदींनी दर्शन घेतले.



पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानमार्फत नवरात्रोत्सवानिमित्त काढण्यात आलेली श्री दुर्गामाता दौड सातव्या दिवशी पळस्पे गावातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकापासून सुरू झाली होती. त्यानंतर गावदेवी मंदिरात देवीची आरती घेऊन ही दौड पुन्हा सुरुवातीच्या ठिकाणी समाप्त करण्यात आली. या वेळी नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.





कळंबोली : नवरात्रीनिमित्त भाजप शहर मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, दिलीप बिस्ट, केशव यादव, देवीदास खेडकर, मच्छिंद्र कुरुंद, राजन पिल्ले, संदीप भगत, वसितु शर्मा यांनी आई अंबेमाता भगत बुवा मंडळ, अजिंक्य तारा मित्र मंडळाच्या देवींचे दर्शन घेतले. ही माहिती भाजप कार्यालयीन चिटणीस जगदीश खंडेलवाल यांनी दिली.



पनवेल : कोपर येथील जय बजरंग कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या देवीचे गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत यांनी सपत्नीक दर्शन घेतले.

## संपादकीय

# विकासाचा मास्टरप्लान

अर्थचक्राला गति देण्यासाठी मोदी यांनी स्वीकारलेल्या अर्थविषयक धोरणाला मोदीनॉमिक्स असे संबोधन जगभरातील अर्थतज्ज्ञांनी बहाल केले आहे. याच मोदीनॉमिक्सचे विशाल स्वरूप म्हणता येईल अशी गतिशक्ती योजना येत्या काही काळात आकारास येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी गतिशक्ती योजनेचे विस्तृत विवेचन करून देशापुढील विकासाचा मास्टर प्लान जाहीर केला. गतिशक्ती योजना भारताच्या पंखांना निश्चितच बळ देईल यात शंका नाही.

**राजकीय इच्छाशक्ती असेल तर सत्ताधाऱ्यांना देशाचा कायापालट करता येऊ शकतो हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या सात वर्षांत अनेक वेळा सिद्ध केले आहे. भारताची उन्नती हाच त्यांचा ध्यास होता व आहे. ते गुजरातचे मुख्यमंत्री होते तेव्हा देखील त्यांनी स्वत:च्या राज्याप्रमाणेच देशाच्या विकासाचाही विचार केला. त्याचे फलित म्हणून आज देशासमोर विकासाचे गुजरात मॉडेल उभे आहे. २०१४ साली प्रचंड जनादेश मिळवत मोदी यांनी पंतप्रधान पदाची सूत्रे स्वीकारली आणि देश विकासाच्या वाटेवर वेगाने दौडू लागला. भारतातील अस्वच्छता आणि दारिद्र्य हे त्यांना सलत होते. स्वातंत्र्यानंतर सहा दशके उलटून गेली तरी अस्वच्छता, शिक्षणाचा अभाव आणि दारिद्र्य यांच्या निर्मूलनासाठी सत्ताधारी काँग्रेसने प्रयत्नच केले नाहीत हे त्यांना दिसत होते. म्हणूनच पंतप्रधान पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर सर्वप्रथम त्यांनी स्वच्छता अभियान हाती घेतले आणि त्याच वेळी अर्थचक्राला गती देण्यासाठी जालीम उपाययोजना सुरू केल्या. मोदी यांना अभिप्रेत असलेले स्वच्छता अभियान सार्वजनिक स्वच्छतेविषयी होतेच, पण त्याचबरोबर भ्रष्टाचाराचा केरकचरा साफ करण्याकडेही त्यांचे लक्ष होते. त्यामुळे जगभरातील अर्थतज्ज्ञांच्या वर्तुळात कौतुकोद्‌गार निघू लागले आहेत. तब्बल १०० लाख कोटी रुपयांची ही महत्त्वाकांक्षी योजना आहे. देशातील संपर्क यंत्रणा मजबूत बनवण्यापासून रोजगाराची हमी देणाऱ्या उपाययोजनांपर्यंत सर्वच बाबींना स्पर्श करणारी ही योजना येत्या पाच वर्षांत फलद्रुप झालेली दिसेल यात शंका नाही. यामध्ये देशाची सर्व टोके जोडणाऱ्या रस्त्यांचे जाळे उभारणे, सर्व महत्त्वाच्या व मोक्याच्या ठिकाणी पायाभूत सुविधा सुसज्ज करणे, देशभरात तब्बल दोन हजारांहून अधिक छोट्या-मोठ्या विमानतळांची उभारणी, रेल्वे वाहतुकीचा परीघ वाढवणे आणि मुख्य म्हणजे स्थानिक पातळीवर लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे अशा प्रकारच्या अनेकविध योजनांचे एकत्रिकरण गतिशक्ती योजनेमध्ये करण्यात आले आहे. या योजनेमुळे भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्सचे लक्ष्य गाठू शकेल अशी खात्री वाटते. गेली दोन वर्षे कोरोना विषाणूशी झगडण्यात वाया गेली. कोरोनाच्या जीवघेण्या दोन लाटांमुळे देशाची अर्थव्यवस्था जर्जर झाली होती, परंतु पंतप्रधान मोदी यांच्या सावध आणि दूरदृष्टीच्या उपाययोजनांमुळे देशाची अर्थव्यवस्था वेगाने रूळावर येऊ लागली आहे. त्याचे प्रतिबिंब शेअर बाजाराच्या वाढत्या निर्देशांकांमधून दिसते. येत्या आर्थिक वर्षात भारताच्या विकासवाढीचा दर ९.५ टक्के राहील असा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जाहीर केला आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था सहा टक्क्यांनी तर चीनची आर्थिक वाढ सुमारे आठ टक्क्यांनी होईल, असे सांगितले जाते. याचाच अर्थ असा की परदेशी गुंतवणुकीच्या दृष्टीने आपला भारत आदर्श ठरू पाहात आहे. पंतप्रधान मोदी यांच्या स्वप्नातील भारत साकार होण्याचे दिवस आता सुरू झाले आहेत असा या साऱ्याचा अर्थ आहे. एका अर्थाने गतिशक्ती योजना हा देशाच्या विकासाचा मास्टरप्लानच म्हणावा लागेल.**

# सब भूमी गोपालकी! सरकारचे राष्ट्रीय भूमीधोरण आवश्यक

**खबरबात**
**शैलेश पालकर**

विविध प्रकल्पांसाठी आवश्यक जमिनींची उपलब्धता सहज सुलभ होण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून भूसंपादन कायद्यात होऊ घातलेले बदल देशवासीयांचा सातबारा उतारा हे भाडेकराराचे पत्र असावे आणि शेतसारा हा भाडेपावतीचा कागद ठरावा, असे चित्र उभे करीत आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका महसूल विभागाची असून या महसूल विभागांतर्गत भूमिअभिलेख विभागासह नोंदणी विभागामध्येदेखील होणारे बदल भारतीयांच्या पायाखालची जमीन सरकविण्यास प्रारंभ करीत आहे. भूमिअभिलेख विभागाच्या जमीन धोरणाचे सरकारी खाजगीकरण करण्याची प्रक्रिया सुरू असून आता आर्थिक घोटाळ्यापेक्षा जमीन घोटाळ्यांची चर्चा होताना दिसत आहे.

कोणत्याही प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या लॅण्ड, लेबर, इन्व्हेस्टमेंट आणि इंटरप्रीन्योरशिप या चार प्रमुख भांडवली घटकांमध्ये लॅण्ड म्हणजेच जमीन हीदेखील महत्त्वपूर्ण गुंतवणूक मानली जाऊ लागली आहे. त्यामुळे काळा पैसा पांढरा करण्यासाठी धनदांडग्यांचा मोठ्या प्रमाणात जमिनी खरेदी करण्याकडे कल दिसून येत आहे. या धनदांडग्या जमीनमाफियांच्या कलाने कायदे करावे लागत असल्याने, मूळ जमीन मालकांच्या पायाखालची जमीन सरकण्यास सुरुवात होणे स्वाभाविक आहे. यामुळे राष्ट्रीय भूमीविषयक धोरण तयार करण्याची गरज आहे.

राज्य सरकारच्या महसूल आणि वनविभाग यांच्याकडील संकीर्ण आदेशाद्वारे जमिनीच्या मोजणी दरात दुप्पट वाढ झाल्याचे आदेश जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख पुणे यांच्या कार्यालयातून जारी करण्यात आला आहे. ही वाढ १० फेब्रुवारी २०१० पासून लागू झाली आहे. प्रचंड अनागोंदी असलेल्या भूमिअभिलेख विभागाच्या कथनी आणि करणीमध्ये असलेल्या अंतराचा अनेक मूळ जमीन मालकांना मनस्ताप झाला असून भामटे मात्र भूमिअभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांचे हात 'ओले' करून अर्थपूर्ण व्यवहार जोपासत आहेत.

भूसंपादन मोजणी, कोर्ट वाटप अथवा कोर्ट कमिशन मोजणी प्राधान्याने करावी लागत असल्याने सर्व प्रकारांतील तातडीची मोजणी फी आकारली जात आहे तर हे मोजणी दर हद्द कायम, बिगरशेती, प्रतवारी अगर अभिलेख दुरुस्ती इत्यादीसाठी लागू झाले आहेत, असे आदेश जमावंदी आयुक्त आणि संचालक डॉ. शैलेशकुमार शर्मा यांनी जारी केले आहेत.

पोलादपूर तालुक्यात, तसेच शहरातही दुसऱ्यांच्या सातबारा उताऱ्यांवर भलत्यांचे मिळकतपत्र असे प्रकार घडत आहेत. ते लक्षात येण्यास विलंब झाल्याबद्दल त्याची दाददेखील भूमिअभिलेख विभागाकडेच मागावयाची असल्याने हेलपाटे आणि खेटा मारून मूळ मालकांची हेळसांड होत आहे. अशा बोगस मिळकतपत्राने मालक झालेले केवळ सरकारी अधिकाऱ्यांच्या मनधरण्या करून आणि वकिलांच्या बिदाग्या देऊन त्यांचे अकाली मालकीकरण जोपासत आहेत.

जमिनी मोजण्यातील दरवाढीसोबतच जमिनीचे मोजमाप करण्यासाठी लाच घेण्याचे प्रकारही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मोठ्या प्रमाणात उघडकीस येत आहेत. यासंदर्भात मूळ जमीन मालकांना याच भूमिअभिलेख विभागाच्या वरिष्ठांच्या कार्यालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ करावे लागत आहे. त्यांना न्यायासाठी अनेक वर्षे रखडविणे आणि वरिष्ठ कार्यालयात अपिल करून पुन्हा कनिष्ठ कार्यालयामध्ये पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याचे प्रकार घडत आहेत. या संपूर्ण प्रकारात मूळ सातबारा मालकास त्याचे हक्काचे प्रॉपर्टीकार्ड देण्यास, तसेच कायदेशीर हक्क असलेली मोजणी करून देण्यास अडथळा केला जाऊन मेटाकुटीस आणले जात आहे.

आता राज्य सरकारच्या महसूल व वनविभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार राष्ट्रीय व राज्य महामार्ग प्रकल्पाच्या भूसंपादनप्रकरणी मोबदल्याच्या रकमेची परिगणना करताना अवलंबावयाच्या कार्यपद्धतीबाबत नवीन शासन निर्णय तयार झाला असून, यामुळे नगरपंचायत व क वर्ग नगरपालिका हद्दीतील भूसंपादनासाठी एक पट आणि ग्रामपंचायत हद्दीतील भूसंपादनासाठी अधिक म्हणजे जास्तीत जास्त पाचपट मोबदला दिला जाणाऱ्या पद्धतीला छेद देणारा नवीन शासन निर्णय अस्तित्वात आला आहे. या नवीन शासन निर्णयाचा सर्वांनाच फटका बसणार आहे. यात शेतकरी भरडला जाणार आहे.

देशातील जमीनविषयक धोरण कायम करताना सब भूमी गोपालकी या न्यायाने सर्व जमिनी सरकारच्याच असून शेती करणाऱ्यांनाच ही जमीन देण्याचे कायदे करण्याची व त्याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

# निवासी झोनचे आरक्षण आमच्या कालावधीत झालेले नाही!

## नगराध्यक्ष स्नेहा पाटील यांचा खुलासा



**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील शेगवाडा परिसरातील क्रीडांगणासाठी राखीव असलेल्या भूखंडाचे आरक्षण बदलण्याचा प्रस्ताव अथवा ठराव शिवसेनेच्या काळात झालेला नाही, तो त्या पूर्वीच्या काळात झाला असून या घटनेशी आमचा कोणताही संबंध नाही, असा खुलासा मुरूडच्या नगराध्यक्ष स्नेहा पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला.

शहरातील शेगवाडा परिसरात क्रीडांगणासाठी राखीव असलेल्या भूखंडाचे आरक्षण बदलून निवासी झोन करण्यात आले आहे, असा आरोप भाजपकडून करण्यात आला होता. त्या संदर्भात नगराध्यक्ष पाटील यांनी पत्रकार परिषदेत खुलासा केला. या वेळी उपनगराध्यक्ष नौसीन दरोगे, गटनेत्या मुग्धा जोशी, पाणीपुरवठा सभापती पांडुरंग आरेकर, मुख्याधिकारी पंकज भुसे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी यांच्या ११ जुलै १९८५च्या पत्रानुसार शेगवाडा परिसरातील खेळाचे मैदान रद्द करून ती जागा निवासी विभागात समाविष्ठ करण्याबाबत कलम ३७ अन्वेय कार्यवाही सुरू करण्यात आली होती, परंतु ती कार्यवाही पूर्ण झालेली नाही, मात्र भूखंडाचे आरक्षण बदलण्याचा ठारव आमच्या कालावधीत झालेला नाही, असे नगराध्यक्ष स्नेहा पाटील यांनी सांगितले.

प्ले ग्राऊंड आरक्षण क्रमांकास काट मारून हिरव्या रंगाने डिलेटेड ॲण्ड इन्क्लुड इन रेसिडेंट झोन असे दर्शवण्यात आले आहे. याबाबत नगररचना विभागास आरक्षण वगळले आहे किंवा नाही हे कळावे यासाठी पत्रव्यव्हार करून अभिप्राय मागितला असल्याची माहिती नगराध्यक्ष पाटील यांनी दिली.

शेगवाडा येथील मोरीवर नगर परिषदेचे पैसे खर्च झाले आहेत. त्यामुळे तातडीने हे बांधकाम तोडता येणार नाही, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले आहे. ही मोरी नगर परिषद तोडणार आहे, मात्र त्यासाठी निधीची प्रतीक्षा आहे. हा निधी मिळावा यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे नगराध्यक्ष पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# खोपोलीतील लव्हेज शाळेची दुरवस्था

## ▌भाजप युवा मोर्चा आक्रमक, मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील लव्हेज शाळेच्या दुरवस्थेबाबत भाजप व युवा मोर्चा पदाधिकाऱ्यांनी बुधवारी (दि. १३) मुख्याधिकारी अनुप दुरे यांची भेट घेऊन जाब विचारला. या वेळी शिष्टमंडळाने त्यांना निवेदनही दिले.

लव्हेज गावातील शाळा क्रमांक ८च्या छतावरील पत्रे वादळात उडाल्यामुळे, पावसाचे पाणी पडून वर्गखोल्यांची दुरवस्था झाली आहे. काही वर्गात दगड विटांचा खच पडला आहे. अशा या परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना बसवायचे कुठे, असा मोठा प्रश्न शिक्षकांना पडला आहे. शाळा सुरू होऊन काही दिवस झाले, तरी प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे.

शाळेच्या छतावरील पत्रे बसवायचे काम दोन वेळा ठेकेदाराने केले होते, परंतु ते काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे युवा मोर्चाचे सरचिटणीस विनायक माडपे यांनी मुख्याधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले, तसेच संबंधित ठेकेदारावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी चर्चेदरम्यान करण्यात आली.

दरम्यान, शाळेचे पत्रे तातडीने बसवण्यात यावे, असे आदेश मुख्याधिकाऱ्यांनी नगर परिषदेच्या बांधकाम विभागाला दिले असून, येत्या दोन ते तीन दिवसांत दुरुस्तीचे काम पूर्ण होईल, असे आश्वासन मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी शिष्टमंडळाला दिले.

या वेळी झालेल्या चर्चेदरम्यान खोपोलीतील पंत पाटणकर चौकात खाजगी बस अनधिकृतपणे पार्किंग केल्या जातात. त्यामुळे रहदारीस अडथळा येऊन अपघाताची शक्यता असल्याने, सदर खाजगी बसमालकांना नगरपालिकेच्या अधिकृत पार्किंग यार्डमध्ये गाड्या उभ्या करण्यास सांगावे, असे या शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांना सांगितले.

भाजपचे शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे, युवा मोर्चा शहर अध्यक्ष अजय इंदुलकर, सरचिटणीस विनायक माडपे, शहर सचिव गोपाळ बावस्कर, सोशल मीडियाचे राहुल जाधव यांच्यासह कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

# रोह्यात प्रभातफेरी व चित्रकला स्पर्धा



(छाया : महादेव सरसंबे)

**रोहे : प्रतिनिधी**

जागतिक बालिका दिनाचे औचित्य साधून रोहा तालुका विधी सेवा समिती व पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. ११) सकाळी शहरात बेटी बचाओ, बेटी पढाओ या संकल्पनेवर आधारित प्रभातफेरी व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

कोएसोच्या रोहे येथील मेहेंदळे हायस्कूल, कोलाड येथील द. ग. तटकरे माध्यमिक विद्यालय, नागोठण्यातील गु. र. अग्रवाल माध्यमिक विद्यालय आणि चणेरे येथील न्यू इंग्लिश स्कूल या चार केंद्रांवर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत २७७ विद्यार्थी सहभागी झाले होते. पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी या दोन गटांत चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

न्या. एस. डी. कमलाकर, पोलीस उपनिरीक्षक अविनाश ढाकरे, गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगरे, मुख्याध्यापक रमेश मोसे, केंद्रप्रमुख नारायण गायकर, संतोष खलापकर, विजय वेळे, विद्या रोहेकर, आदर्श शिक्षक ब्रिजेश भादेकर, परीक्षक विलास सुटे, विजय धोत्रे, नंदकुमार भादेकर, पर्यवेक्षक म्हात्रे, दिवाणी न्यायालयातील कनिष्ठ लिपिक आशा वेल्हाळ, राजश्री गरुड, वनिता पवार, विकर्ण दांडेकर यांच्यासह न्यायालयीन कर्मचारी, वाहतूक पोलीस, शिक्षक, पालक व विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

# भातसई येथील महादेवी माता

**रोहे : महादेव सरसंबे**



नवसाला पावणारी देवी म्हणून रोहे तालुक्यातील भातसई येथील महादेवी मातेची ओळख असून, या मातेचा नवरात्रोत्सव भातसईसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या उत्साहात साजरा करीत आहेत. अश्विन शुद्ध प्रतिपदेला देवीची पालखी मंदिरात आणली जाते. या वेळी ग्रामस्थांच्या उपस्थितीत घटस्थापना केली जाते. त्यानंतरच पंचक्रोशीतील सर्व मंदिरात घटस्थापना केली जाते. येथूनच परिसरातील नवरात्रोत्सवास सुरुवात होते.

रोहा तालुक्यात अनेक प्राचीन मंदिरे आहेत. त्यातीलच एक भातसई येथील श्री महादेवी माता मंदिर होय. रोहा-अलिबाग मार्गावर हे मंदिर येत असून, रोह्यापासून सहा तर नागोठण्यापासून १४ किमी अंतरावर हे मंदिर आहे. या जागृत देवस्थानाबद्दल आख्यायिका सांगितली जाते. गावातील गुराखी आपल्या गुरांना घेऊन जंगलात गेला होता. एका करवंदीच्या झुडपापाशी त्याला देवी अवतरलेली दिसली. नंतर ती अदृश्य झाली. नंतर ही देवी सध्याच्या देवळाजवळ प्रकट झाल्याचे सांगितले जाते. पुढे या देवीला महादेवी असे ओळखू लागले. ग्रामस्थांच्या रक्षणासाठी महादेवी माता आपला भाऊ श्री धावीर महाराज यांच्याबरोबर मध्यरात्रीच्या सुमारास भातसई व आजूबाजूच्या गावात फिरत असते, असे ग्रामस्थ सांगतात.

ग्रामस्थांनी १९०७ मध्ये श्रमदानातून श्री महादेवीचे नवीन मंदिर बांधले आहे. या मंदिरात नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या वर्षीही नवरात्रोत्सवास सुरुवात झाली आहे. मंदिराला विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. रोज मातेची पूजाअर्चा, आरती, भजन, हरिपाठ केले जात आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन वर्षांपासून येथील नवरात्रोत्सव साध्या पद्धतीने व नियमांचे पालन करून साजरा केला जात आहे, मात्र भक्तांची देवीच्या प्रती असलेली श्रद्धा आजही कायम आहे. चैत्र पौर्णिमाला भातसई येथील श्री महादेवीची यात्रा असते. गळ टोचणीचा कार्यक्रम हे या यात्रेचे मुख्य आकर्षण आहे.



# पालीत लसीकरण, आरोग्य तपासणी शिबिर

**पाली : प्रतिनिधी**

मिशन कवच कुंडल अंतर्गत सुधागड पालीतील ओसवाल प्लाझा फेडरेशनतर्फे मंगळवारी (दि. १२) लसीकरण व आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

तहसीलदार दिलीप रायणणावार, गटविकास अधिकारी विजय यादव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत मढवी, ओसवाल प्लाझा सोसायटीचे अध्यक्ष चिंतामणी खोडागळे, कार्याध्यक्ष विद्यानंद अधिकारी, उपाध्यक्ष अशोक महामुनी, सचिव महेंद्र जाधव, खजिनदार भागवत खेडेकर यांच्यासह सदस्य उपस्थित होते. सुधागड तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. नंदकुमार मुळे यांनी या लसीकरण व आरोग्य तपासणी शिबिराचे नियोजन केले होते.

मिशन कवच कुंडल अभियानात सुधागड तालुक्यातील सर्व हौसिंग सोसायट्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन तहसीलदार दिलीप रायणणावार यांनी या वेळी केले.

# नेरळकर पिताहेत गढूळ पाणी!

## जलशुद्धीकरण केंद्र बंद असल्याचा परिणाम

**कर्जत : बातमीदार**

नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थ गेल्या काही दिवसांपासून गढूळ पाणी पीत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर साथीच्या आजारांना सामोरे जाण्याची वेळ आली आहे. नेरळ पूर्व भागात गढूळ आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चादेखील नेला होता. दरम्यान, नेरळ ग्रामपंचायतीला पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेतील जलशुद्धीकरण केंद्र गेल्या चार महिन्यांपासून बंद असल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत.

नेरळ गावासाठी १९९८मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून साडेसात कोटींची नळ पाणीपुरवठा योजना केली. या पाणीपुरवठा योजनेची मुदत २०२१पर्यंत होती, मात्र २०२१ साल संपायची वेळ आली, तरी नेरळ गावासाठी नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर झालेली नाही. सध्याची पाणीपुरवठा योजना जुनी झाल्यामुळे नेरळच्या अनेक भागांत आज कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे, येथील नागरिकांना गेल्या काही महिन्यांपासून गढूळ पाणी प्यावे लागत आहे.



(छाया : संतोष पेरणे)



नेरळ ग्रामपंचायत हद्दीत पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेतील जलशुद्धीकरण प्रकल्प बंद असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत. त्या जलशुद्धीकरण केंद्राचे फिल्टर प्लांट पावसाळ्यापासून बंद असल्याचे बोलले जात असून, ग्रामपंचायतीचा पाणीपुरवठा विभाग केवळ आलम टीसीएल हे साहित्य पाणी शुद्ध करण्यासाठी टाकत असतात. पाणी शुद्ध करणारी यंत्रणा बंद पडल्याने उल्हास नदीमधून उचललेले गढूळ पाणी नळाद्वारे थेट घरोघरी पोहचत आहे. नेरळमधील दवाखान्यांत गेल्या काही दिवसांपासून ताप, सर्दी आणि खोकला या आजारांचे रुग्ण आढळून येत आहेत.

नेरळ पूर्व भागात गढूळ आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने तेथील कार्यकर्ते कुमार गोपणे, योगेश पवार, एस. बी. बोडक, डॉ. श्याम पावरा, राहुल पाटोळे, प्राजक्ता उतेकर, संगीता पाटोळे, दीपाली पवार यांच्यासह काही ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चा काढला होता. ग्रामपंचायतीने त्यांना या आठवड्यात पाणीपुरवठा सुरळीत होईल, असे आश्वासन दिले आहे, मात्र जलशुद्धीकरण केंद्र बंद आहे काय? या प्रश्नाचे उत्तर ग्रामपंचायत देऊ शकली नाही.

> **नेरळ पूर्व भागातील गटारे तुंबली आहेत, रस्त्याची स्थिती खराब आहे आणि जेमतेम दोन हंडे पाणी मिळत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून आम्हाला गढूळ पाणी प्यावे लागत आहे.**
> **–कुमार गोपणे, रहिवासी, निर्माण नगरी, नेरळ**

> **ग्रामपंचायतीकडून जलशुद्धीकरण केंद्राचे काम सुरू आहे. अनेक व्हॉल्व्ह चोकअप झाले आहेत. गेले तीन दिवस त्यांची दुरुस्ती सुरू आहे. या आठवड्यात शुद्ध पाण्याचा पुरवठा होईल.**
> **–गणेश गायकर, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, नेरळ**



### महाविकास आघाडी सरकारविरोधात

## खालापूर भाजपचे तहसीलदारांना निवेदन

**खोपोली : प्रतिनिधी**

भटके विमुक्त जाती जमातीच्या शासकीय पदोन्नतीमधील आरक्षण सध्याच्या महाविकास आघाडी सरकारने रद्द केल्याच्या निषेधार्थ खोपोली शहर भाजपच्या भटके–विमुक्त सेलतर्फे खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांना निवेदन देण्यात आले.

भाजपचे खोपोली शहर अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे, भाजप भटके–विमुक्त अध्यक्ष संतोष लोहार, युवा मोर्चा अध्यक्ष अजय इंदुलकर, सरचिटणीस विनायक माडपे, शहर चिटणीस गोपाळ बावस्कर, सोशल मीडियाचे राहुल जाधव, बूथ अध्यक्ष करण यादव इत्यादी या वेळी उपस्थित होते.


## TENDER NOTICE

**The Principal, Rayat Shikshan Sanstha's Sau. Shakuntala Ramsheth Thakur (CBSE) Vidyalaya Plot No-241, Sec-24, Pushapaknode, Ulwa, Tal- Panvel, Dist- Raigad** invites tenders for the following equipment through the website of MKCL, https://edumart.sets.co.in

| Equipment | Tentative Estimated cost | Start date | Last date |
|---|---|---|---|
| Proposed construction of compound wall & M.S. Grill work | 35,50,000/- | 14/10/2021 From 10:00 a.m. | 21/10/2021 till 06:00 p.m. |

For more details please refer https://edumart.sets.co.in

**Sd/-**
Principal,
Sau. Shakuntala Ramsheth Thakur (CBSE) Vidyalaya,
Pushpak Node,
Mob-9870177088

**Sd/-**
Secretary,
Rayat Shikshan Sanstha,
Satara, (Maharashtra)


# द्रुतगती महामार्गावर द बर्निंग टेम्पो

### एकाचा होरपळून मृत्यू

**खोपोली, खालापूर, मोहोपाडा : प्रतिनिधी**

मुबंई–पुणे द्रुतगती महामार्गावर मध्यरात्री १२च्या सुमारास एका आयशर टेम्पोने अचानक पेट घेतला. या घटनेत एका व्यक्तीचा होरपळून मृत्यू झाला.

मुबंईकडून पुण्याकडे जाणारा आयशर टेम्पो काही तांत्रिक बिघाड असल्याने महामार्गावरील रसायनी हद्दीत बंद पडला होता. पोलिसांच्या गस्ती पथकाने त्या टेम्पोला एका बाजूला करून बॅरिगेट्स लावले होते. त्यानतंर काही वेळाने या टेम्पोने अचानक पेट घेतला.

आग आटोक्यात आणण्यासाठी खोपोली नगर परिषद, सिडको, रिलायन्स आणि आयआरबीच्या अग्निशमन दलाने आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत टेम्पोतील सौदर्य प्रसाधने, अगरबत्ती, वायर, इलेक्ट्रिकल साहित्य व विविध प्रकारच्या वस्तूसह आयशर टेम्पो पूर्णपणे जळून खाक झाला, तसेच टेम्पोच्या केबिनमधील एका व्यक्तीचा होरपळून मृत्यू झाला. अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे विजय भोसले, गुरुनाथ साठेलकर, अमित गुजरे, यासिन शेख यांनी मृतदेह बाहेर काढून तो शविच्छेदनासाठी चौक येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविला. या वेळी मुबंई–पुणे द्रुतगती महामार्गावर काही प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती.

(छाया : विनायक माडपे)




Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## SMT. BHAGUBAI CHANGU THAKUR VIDYALAYA , ENGLISH MEDIUM DRONAGIRI - URAN

Plot No.60/61, Sector- 12, Tal: uran. Dist: Raigad. - 400 707

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2021-2022**

**PRIMARY SECTION & SECONDARY SECTION : (I to X)**

**1) ASSISTANT TEACHER : (Physical Educator)**
B.A./ B.Com/ BSc. B.P.Ed.

Applications with full details should reach to the **CHAIRMAN, JBSP SANSTHA**, at **SMT. BHAGUBAI CHANGU THAKUR VIDYALAYA , ENGLISH MEDIUM DRONAGIRI-URAN** Plot No : 60/61, Sector-12, Tal: Uran . Dist: Raigad - 400 707.
Candidates may submit the application by email to **bctvidyalaya@gmail.com** on or before 27th October 2021.

If required **Contact No. 9819212918 / 9594964872**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## CHANGU KANA THAKUR VIDYALAY, ENGLISH MEDIUM, NEW PANVEL

Plot No.8, Sector- 14, New Panvel, Tal : Panvel, Dist : Raigad, Navi Mumbai - 410206.

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2021-2022**

**PRIMARY SECTION : (I to IV)**

**1) ASSISTANT TEACHER :**
MATHS & E.V.S. - POST - 1
B.Sc/ D.Ed. With 5 years experience.

**SECONDARY SECTION : (VIII TO X )**

**1) ASST TEACHER :** COMPUTER – POST – 1
BCA / B.Sc Computer Science / B.Sc.Diploma in Computer Science (3 yrs)

Applications with full details should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA, plot no: 8, Sector-14, New Panvel.Tal: Panvel. Dist: Raigad. Navi Mumbai. 410206.**
Candidates may submit the application by email **for Secondary Section email** on ckteshm@gmail.com & for **Primary Section email** on cktvengprimay@yahoo. in on or before 27th Ocober 2021.
If required **Contact No. For Secondary Section :- 9869967847 / 9594967401** & for **Primary Section** :- 9372188189.

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## MORU NARAYAN MHATRE VIDYALAYA & TUKARAM NARAYAN GHARAT JR. COLLEGE

**(ENGLISH MEDIUM)**
**Near Shree Chatrapati Shivaji Vidyalaya**
**GAVHAN- KOPAR, ULWE NODE**
Plot No.1 Sector- 8, Tal: Panvel. Dist: Raigad. Navi Mumbai-410206

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2021-2022**

**PRINCIPAL : POST – 1**
M.Sc.-B.Ed. with Teaching & Administration experience atleast 5 yrs.

**PRIMARY SECTION : (I TO V) : POST - 3**

**1) ASSISTANT TEACHER :**
**(ENGLISH / SCIENCE – EVS / DRAWING)**
B.A.-D. ED / B.ED. / B.Sc., D.Ed./B.ED. / ATD.

**UPPER PRIMARY SECTION: (VI & VII) : POST - 3**

**1) ASST. TEACHER :**
**(ENGLISH /MATHEMATICS / SST.)**
B.A.-D. ED / B.ED. / B.Sc., D.Ed./B.ED. / ATD

Applications with full details should reach to the **CHAIRMAN, JBSP SANSTHA, at MORU NARAYAN MHATRE VIDYALAYA, Near Shree Chatrapati Shivaji Vidyalaya @ Kopar-Gavhan, Tal. Panvel, Dist : Raigad.**
Candidates may submit the application by email to **mnmv.primary@gmail.com** on or before 27th Ocober 2021.
If required **Contact No. 9137042080 / 9773323876**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel




## अलिबागमध्ये दोन ट्रकची जोरदार धडक, एक जण जखमी

**अलिबाग : प्रतिनिधी**

येथील आरसीएफ कॉलनीजवळ बुधवारी (दि. १३) दोन ट्रकची समोरासमोर ठोकर होऊन झालेल्या अपघातात एका ट्रकचा चालक जखमी झाला. त्याच्यावर अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातामुळे या मार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती.

उसर येथून एचपी गॅस घेऊन ट्रक चालक हा बुधवारी पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास अलिबागकडे येत होता. चालकाला डुलकी लागल्याने अलिबागकडून रोह्याकडे जाणाऱ्या बर्फाच्या ट्रकला गॅसच्या ट्रकचालकाने विरुद्ध दिशेला जाऊन धडक दिली. या अपघातात बर्फ घेऊन जाणारा ट्रकचालक जखमी झाला. गॅसची वाहतूक करणाऱ्या ट्रकचा चालक पळून गेला. नागरिकांनी जखमी चालकाला रुग्णालयात दाखल केले. गॅसची वाहतूक करणाऱ्या ट्रक चालकाविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कर्जतमध्ये घराला आग

**कर्जत : प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दीतील सेवालाल नगर येथील एका घराला मंगळवारी (दि. १२) शॉर्टसर्किटमुळे आग लागली. या घटनेत संपूर्ण घर भस्मसात होऊन घरातील पत्र्याच्या पेटीतील पाच लाख रुपयांची रोख रक्कम आगीत जळून खाक झाली.

कर्जत–मुरबाड रस्त्यालगत सेवालाल नगर असून तेथे अनिल चंदर राठोड यांचे घर आहे. पाच दिवसांपूर्वी अनिल राठोड व त्यांच्या पत्नी कर्नाटक येथे गेले आहेत. फक्त त्यांची मुलगी घरी होती. ती घराला लॉक करून बाहेर गेली होती. त्याच दरम्यान घरामध्ये शॉर्टसर्किट झाले व घरातून आगीचे लोळ बाहेर आले. आग लागल्याचे लक्षात येताच शेजारी राहणाऱ्या सीताबाई सुधाकर चव्हाण यांनी मदतीसाठी आरडाओरडा केला. अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी पोहचली व आग आटोक्यात आणली. तोपर्यंत घरातील सर्व काही आगीत जळून गेले होते. घरातील सामान बाहेर काढताच पत्र्याच्या पेटीतून धूर निघताना दिसला. पेटीत असलेली पाच लाख रोख रक्कम जळून राख झाली होती. यामधील अगदी थोडी रक्कम वाचविण्यात यश आले. तलाठ्यांनी तेथे जाऊन पंचनामा केला. या आगीत सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

## कागदपत्रे हरवल्याबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, श्री. विजय गणेश तायडे व सौ. आरती विजय तायडे, आमचे नावे असलेली मिळकत वर्णन:– रो हाऊस नं. २, रिव्हर रो–हौसेस को–ऑप. हौसिंग सोसायटी, चिपळे व्हिलेज, चिपळे, ता. पनवेल पिनकोड ४१० २०६, ता. पनवेल, जि. रायगड या सदनिकेचे १) सनराईज हाऊस मेकर्स प्रा. लि. व श्री. ए. एस. सुकुमारन आणि आमचेमध्ये झालेले ओरिजिनल अॅग्रीमेंट फॉर सेल दिनांक २४/०९/१९९६ आणि २) सबरजिस्ट्रार पनवेल अ. क्र. ६८८८ अन्वये रजिस्टर झालेले श्री. ए. एस. सुकुमारन आणि आमचे मध्ये झालेले ओरिजिनल डिड ऑफ ट्रान्सफर अँड सेल दिनांक २१/१०/२००९ हे दोन्ही दस्त नवीन पनवेल परिसरांत प्रवासा दरम्यान कोठेतरी पडून गहाळ झाले आहेत. सदर प्रकाराबाबत खांदेश्वर पोलीस ठाणे यांचेकडे मिसिंगची तक्रार करण्यांत आली आहे. तरी आमची मुळ कागदपत्रे कोणासही कुठेही सापडल्यास अथवा मिळाली असल्यांस खाली नमूद पत्त्यावर प्रत्यक्ष किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यांत यावीत, किंवा समक्ष येवून भेटावे, ही विनंती.

**श्री. विजय गणेश तायडे**
**सौ. आरती विजय तायडे**

पनवेल
दिनांक : १४/१०/२०२१
एफ.–००२/००३, साई संसार कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ३०, सेक्टर– ५, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
मोबाईल नं. ९८२०७२७२७७/९८१९३८६२४४

## जाहीर नोटीस

**अॅड. के. के. गोंधळी**
**अर्जदारातर्फे वकील**

**पनवेल येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात**
**फौजदारी चौ. अर्ज नं.**
**नि. ८/ड**

श्री. संतोष रामभाऊ पाटील
वय ४७ वर्षे, धंदा – शेती,
रा. टेंभोडे, ता. पनवेल, जि. रायगड } अर्जदार

विरूद्ध

पनवेल महानगरपालिका
सक्षम अधिकारी } सामनेवाला

कारणे जाहीर नोटीस देण्यात येते की,

ज्या अर्थी अर्जदार यांचा मुलगा **कु. रुद्र संतोष पाटील** ह्याचा जन्म हा दि. ०२/०३/२०१३ रोजी **मौजे टेंभोडे, ता. पनवेल, जि. रायगड** येथे झालेला असल्याने अर्जदाराने त्यांच्या जन्माची नोंद होणेकरिता पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायालयामध्ये अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू कु. रुद्र संतोष पाटील ह्या वर नमूद तारखेस व ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास सांगण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि. १६/९/२१ रोजी दिली.

**सही/–**
**क. लिपीक**
**फौजदारी न्यायालय पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा. अधीक्षक**
**फौजदारी न्यायालय पनवेल**


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

## CHANGU KANA THAKUR ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, NEW PANVEL (AUTONOMOUS)

Plot No. 01, Sector 11, Khanda Colony, New Panvel, (W), Navi Mumbai - 410206

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2021-2022 (FOR SELF-FINANCE PROGRAMMES)**

| Sr. No. | Subjects | Specialization |
|---|---|---|
| 1 | Computer Science | MCA/ Computer Science/ Information Technology |
| 2 | Management Studies | Finance<br>Human Resource |
| 3 | Placement Co-ordinator | HR or Equivalent |
| 4 | Science Resource Center | Technician having knowledge of maintenance and handling the sophisticated instruments like UV visible spectrophotometer, FTIR, AAS, GC etc. |
| 5 | Counsellor | Clinical Psychology or equivalent |

- Qualification as per the University Norms
- Applications with full details should reach to the **CHAIRMAN, J.B.S.P. SANSTHA, CHANGU KANA THAKUR, ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, NEW PANVEL (AUTONOMOUS)**, Plot No. 1, Sector-11, Khanda Colony, New Panvel. (W) 410206.
- **Last date for application -**
- Candidates may submit the application by email, principal@ckthakurcollege.net.On or before 27th October 2021
- If required Contact :- Mr. Pralhad Thakur - **9022600288**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL (C.B.S.E.) KHARGHAR.

Plot no: 11 & 11A Sector- 19 Khaghar, Navi Mumbai – 410 210

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2021-2022**

- **SECONDARY SECTION : POST : 1**

**1. ASST TEACHER (TGT) :**
ENGLISH - M.A./B.A./B.ED. in English.

- **PRIMARY SECTION : POST: 1 each.**

**1. ASST. TEACHER (PRT) :**
ENGLISH - M.A./B.A./B.ED. in English.
**2. COMPUTER TEACHER (PRT) : MCA / BCA.**

- **ADMINISTRATIVE STAFF:**

1. **LIBRARIAN** - B.Lib / M.Lib - POST - 1.
2. **ACCOUNTANT** - B.com / M.com with 5 yrs experience in Tally - POST-1.
3. **BUS INCHARGE** – B.Com. with 5 yrs experience in Tally POST - 1 (Only Male)
4. **MANAGER** - MBA POST – 1.
5. **RECEPTIONIST** - Graduate with good Communication skill in English POST – 1

Applications with full details should reach to the **CHAIRMAN, JBSP SANSTHA,** at **RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL KHARGHAR, Plot No- 11 & 11A, Sector-19, Kharghar. Navi Mumbai-410210.**
Candidates may submit the application by email to **rtpsfrontoffice@gmail.com** on or before 27th Ocober 2021.
If required **Contact :- 07208546691 / Office : 022-27744410**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

# रायगड प्रीमियर लीगच्या सराव सामन्यांना सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात नोव्हेंबर महिन्यात होऊ घातलेल्या टी-२० लीग क्रिकेट स्पर्धेत सहभागी आठ संघांचे प्रशिक्षण शिबिर व सराव सामन्यांना सुरुवात झाली आहे.

कोरोना लॉकडाऊन काळात सर्वच मैदानी खेळांवर बंधने आली होती. सध्या कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरण मोठ्या प्रमाणात होत असल्याने कोरोनाचा प्रादूर्भाव कमी होत चालला आहे. राज्यातील शाळा-कॉलेज सुरू करण्यात आली असून सर्व प्रार्थनास्थळेदेखील उघडण्यात आली आहेत. आता प्रतीक्षा आहे ती मैदानी खेळांच्या स्पर्धांना परवानगी मिळण्याची.

जिल्ह्यातील युवा क्रिकेटपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी रायगड प्रीमियर लीग समितीने २५ वर्षाखालील मुलांसाठी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन नोव्हेंबर महिन्यात केले आहे. या स्पर्धेत सहभागी झालेल्या आठही संघांनी आपापल्या खेळाडूंसाठी प्रशिक्षण शिबिर व सराव सामन्यांचे आयोजन करण्यास सुरुवात केली आहे.

जंजिरा चॅलेंजर्स संघाचे मालक सचिन राऊळ, व्यवस्थापक अ‍ॅड. राहुल नाईक आणि प्रशिक्षक उमाशंकर सरकार यांनी आपल्या संघाचे प्रशिक्षण व सराव सामन्यांचे आयोजन अलिबाग येथील वरसोली समुद्रकिनारी असलेल्या हिरव्यागार क्रीडांगणावर केले आहे. असाच एक सराव सामना जंजिरा चॅलेंजर्स विरुद्ध अलिबाग सी-हॉक्स अ‍ॅडवोकेट्स क्रिकेट संघ यांच्यात खेळविण्यात आला.


अ‍ॅड. महेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या अलिबागच्या वकील संघाने चुरशीची लढत देत जंजिरा चॅलेंजर्सच्या युवा खेळाडूंना क्रिकेट खेळात अनुभव असणे किती महत्त्वाचे असते हे दाखवून दिले. १८ महिन्यांच्या दीर्घ कालावधीनंतर क्रिकेट सामना खेळण्याचा आनंद दोन्ही संघांनी पुरेपूर घेतला.

सामना पाहण्यासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष तथा रायगड प्रीमियर लीग स्पर्धा समितीचे सचिव जयंत नाईक, स्पर्धा समितीचे अध्यक्ष राजेश पाटील आदी उपस्थित होते.

## देवी दर्शन



पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शिवाजीनगर, कोपर, गव्हाण आदी ठिकाणी सदिच्छा भेट देऊन दुर्गामातेचे दर्शन घेतले. या वेळी आयोजकांनी त्यांचे स्वागत केले.








पनवेल : भाजप भटके विमुक्त महिला आघाडीच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी कामोठे येथील विद्या तामखडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, तसेच ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



पनवेल महानगरपालिका मुख्यालयातील महिलांनी नवरात्रीच्या रंगोत्सवात सहभाग घेतला.